प्रेसनोट                    दिनांक ०८/०१/२०२६

**वसई – सनसिटी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. देयक व महसुल उपविभाग, वसई पश्चिम येथील लोकसेवक श्री सुरेंद्रन अंनत सुब्रमण्यम पिल्ले, पद – सहा. अभियंता, वसई (वर्ग –२), यांचेविरुध्द लाचलुचपत विभागाकडून सापळा कारवाई झाले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | :– | ठाणे |
| **गुन्हा नोंद कमांक** | :– | मानिकपुर पोलीस स्टेशन, वसई दैनंदिनी क्रमांक ०६८/२०२६, वेळ २२:४७ दिनांक ०८/०१/२०२६, |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | :– | लेकसेवक श्री सुरेंद्रन अंनत सुब्रमण्यम पिल्ले, पद – सहा. अभियंता, वसई (वर्ग –२), |
| **मागितलेली लाचेची रक्कम** | :– | २५,०००/– रूपये |
| **स्विकारली लाचेची रक्कम** | :– | २०,०००/– रूपये (तडजोडअंती) |
| **थोडक्यात हकीकत** | :– | यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर असून त्यांनी म.रा.वि.वि.कंपनी मर्या. देयक व महसुल उपविभाग वसई (प) येथे त्यांनी ग्राहकाचे ४ घरगुती व २ व्यवसायीक असे एकूण ६ प्रकरणे दिनांक ०५/०१/२०२६ रोजी नविन लाईट मिटर कन्केशनकरीता जमा केली होती. तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.पिल्ले साहेब ज्युनियर अभियंता यांची भेट घेऊन त्यांनी जमा केलेली कामाची पुर्तता लवकरात लवकर करण्याची विनंती केली होती. त्यावेळी लोकसेवक श्री.पिल्ले साहेब ज्युनियर अभियंता यांनी नविन मिटर प्रकरण मंजुर करणेकरीता घरगुती व व्यवसायीक मिटर बसवण्याची मंजुरी देण्याकरीता प्रत्येक एचीपी करीता ५०० रूपये दराने ४० एच पी यांचे एकुण २०,०००/–व यापुर्वी केलेल्या कामाचे शिल्लक ५,०००/– रूपये असे एकुण २५,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली. अशा आशयाची तक्रार तक्रारदार यांनी दि. ०६/०१/२०२६ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक ०६/०१/२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता यातील तक्रारदार यांचेकडे लोकसेवक श्री सुरेंद्रन अंनत सुब्रमण्यम पिल्ले, पद – सहा. अभियंता, (वर्ग –२), यांनी तडजोडअंती २०,०००/–रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दि. ०८/०१/२०२६ रोजी सर्व कायदेशिर बाबी पुर्ण करून सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री सुरेंद्रन अंनत सुब्रमण्यम पिल्ले यांना २०,०००/– रु. मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारताना १८:५१ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. लोकसेवक श्री सुरेंद्रन अंनत सुब्रमण्यम पिल्ले पद – सहा. अभियंता, वसई (वर्ग – २) यांना ताब्यात घेण्यात घेवून यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. भागवत सोनावणे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्‌दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम – ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी कमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्‌अॅप्स् कमांक – ९९३०९९७७००/९७६९९९१०६४


पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( अनिल जायकर )
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे.